म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2335



REFBK-0022165
REFBK-0022165

# चंदन

रमाकांत जाधव

१५६ कै
२२७६५
क १०५.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(कृ.मा.प.)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# चंदन

## रमाकांत जाधव

REFBK-0022165
REFBK-0022165

हिरा प्रकाशन : १.

प्रथमावृती : एप्रिल १९७८.

मांडणी : प्रा. मुरलीधर गोडे.

सर्वाधिकार : रमाकांत जाधव,
१२/१, माझगांव ताडवाडी,
बी. आय. टी. चाळ, तळमजला,
सेन्टमेरी रोड, मुंबई ४०० ०१०.

प्रकाशक : श्री. हरिभाऊ तडके
हिरा प्रकाशन,
सखुबाई जाधव चाळ,
खो. क्र. ६, शास्त्री नगर,
वर्तक नगर, ठाणे.

प्रस्तावना : प्रा. केशव मेश्राम.

मुखपृष्ठ : श्री. अनंत वडये.

मुद्रक : दीनानाथ कृ. पै
रंजना प्रकाशन,
बी/३२, रॉयल इंडस्ट्रीयल इस्टेट,
नायगांव क्रॉस रोड,
वडाळा, मुंबई ४०० ०३१.

मुल्यांकन : ६ रुपये मात्र.

भरडलेल्या, नाडलेल्या, छळलेल्या, अन्नासाठी

वणवण भटकणाऱ्या–बेवारशी दीन–दुबळ्यांना———

—अर्पण

# ऋण-निर्देश

प्रा. केशव मेश्राम, प्राचार्य-मो. वि. माळी,
प्रा. घनःश्याम तळवटकर, प्रा. शान्ता शेळके,
प्रा. म. द. नाडकर्णी, प्रा. मुरलीधर गोडे,
प्रा. रमेश पानसे, प्रा. आ. ना. पेडणेकर.

कवी- कै. ग. दि. माडगुळकर, नारायण सुर्वे, दया पवार, अर्जुन डांगळे, प्रल्हाद चेंदवणकर, ज. वि. पवार.

श्री. धर्माजी रा. जाधव, सौ. हिराबाई ध. जाधव.
श्री. का. भि. शेवडे, सौ. जयश्री का. शेवडे,
श्री. हरिभाऊ तडके, श्री. अशोक गायकवाड, श्री. अनंत वडये, श्री. एच्. एम्. खैरे, श्री. विजय मुथा, श्री. भवरलाल सिरोहिया, श्री. दीनानाथ पै., प्रेसमधील कामगार बंधु.

कांहीशी केलेल्या वाङ्मयीन चर्चेतून, काहींच्या लिखाणातून, काहींच्या मार्गदर्शनातून, काहींच्या सहकार्यातून मी आज उभा आहे. या सर्वांचे आभार शब्दात मांडणे कठिण.

—रमाकांत जाधव

# प्रस्तावना

श्री. रमाकांत जाधव एक नवोदित कवी आहेत. स्वतःची वाट सापडेपर्यंत प्रत्येकजण मळलेल्या वाटेने वाटचाल करीत असतो. अनुकरणाच्या सोयीस्कर रस्त्याने जात असतो पण जाधव या दृष्टीनेही नवे आहेत. फारशी प्रसिद्धी नसताना आपले काव्य ग्रंथरूपाने प्रसिद्ध करण्याची त्यांची जिद्द व आत्मविश्वास विलक्षण आहे. आणि जेव्हा कवी आपला काव्यसंग्रह काढायचा असा निश्चय करतो, त्या धाडसाला मुक्तपणे दाद देणे मला माझे आवडीचे काम वाटते.

एकोणीसशे साठ ते सत्तर ह्या एका दशकात नव्या मराठी कवितेला अनेक फाटे फुटले. जुन्या परिचित वळणाची रोमँटिक कविता ही तर चालू होतीच. पण त्यात इंग्रजी वळणाची व अत्यंत व्यक्तिगत धाराही मिसळली. साम्यवादी व समाजवादी विचारसरणीने भारून निघालेल्या कवींच्या कवितांचे वेगळेपणही ह्याच दशकात नजरेत भरले. आपल्या जन्मापासूनच्या अन्याय अत्याचारांच्या आचेने उसळणाऱ्या दलित कवींच्या टवटवीत व अनोख्या शब्दांना, ह्याच कालखंडात लक्षणीय रूप आले. एकंदरीत हे दशकच नव्या मराठी कवितेला समृद्ध आणि संपन्न करणारे असे ठरले.

ह्या दशकाचा रसरशीत उद्‌गार हा अनेक मूक व बध्याची भूमिका घेणाऱ्या तरुण मनांना बोलका न करता तरच नवल म्हणायला हवे. आपल्या 'चंदन' या संग्रहाविषयी हितगुज करताना. श्री. रमाकांत जाधव यांनीही याच गोष्टीची कबुली दिली आहे.

अवतीभोवतीच्या वास्तवाचे आणि विश्वाचे श्री. रमाकांत जाधव बारकाईने निरीक्षण करतात. घडणाऱ्या गोष्टी आणि जपलेल्या अपेक्षा यांच्यातील तफावत त्यांच्या मनाला ढोलपाडून काढते आणि उमटतो तो उद्‌गार एका कविमनाचा तर असतोच, पण तो अनेक हताश चेहऱ्यांचाही एक कडवट सूर असतो. त्यांची 'चंदन' ही कविता याचेच द्योतक आहे. तसे 'चंदन' हे मराठीतील एक अत्यंत जुने प्रतीक. ज्ञानेश्वराच्या, अंग अंग जाळणाऱ्या 'चोळी' पासून तो तुकारामाच्या 'चंदनाचे हात पायही चंदन' पर्यंत, किंवा शाहीरी काव्यातील 'चंदन उहाळीस जसा लपेटा काळेनागिणीचा' असणाऱ्या वेणीपर्यंत पण हेच प्रतीक हा कवी का निवडतो ? आपल्या कवितेच्या पुस्तकाला असे शीर्षक का निवडतो ? सर्व तऱ्हेच्या समृद्धीला, संतृप्तीला

वैभवाला कवी 'चंदन'च मानतो. मानव आणि तोही जाती, वंश, भेद विरहीत असा या वैभवाचा उपभोक्ता पण स्मरणात राहील असे भोक्तव्य सर्वसामान्याच्या वाट्याला कधी येतच नाही. मलय पर्वतावर भिल्लपुरंध्री चंदनाचा इंधनासारखा उपयोग सुभाषितातच करतात. पण मानवाला ह्या सुगंधठेव्यापासून वंचितच रहावे लागले. म्हणून कवी म्हणतात,

**आम्ही आहोत उन्हात पोळलेली झाडे**
**आमच्याच मूर्खपणाच्या काटेरी फांद्या**
**पाने फुले नसलेल्या**

आणि त्याआधी ते लिहितात—

**पण चंदन**
**घ्राणेंद्रिये नसलेल्या आत्मतृप्त देवदेवतांसाठी**
**आणि नरक आपल्यासाठी असतील!**

कवीची ही मनोभूमिका त्यांच्या काव्याचे अंतरंग सूचित करणारी अशीच आहे.

समाजात घडणारी अनेकविध स्थित्यंतरे, त्यातील विषमतेच्या आणि क्रौर्याच्या अनुभूतीने होणारी तगमग आणि जाणवण्याइतका प्रखर विरोध या गोष्टीकडे श्री. जाधव यांचे प्रामुख्याने लक्ष वेधले जाते. विशेषतः देशाला स्वातंत्र्य मिळाले. राज्यकर्त्यांनी भरपूर आश्वासने पेरली आणि अपेक्षाभंगाचे महामूर पिक आले. जाधव यांच्या अनेक कवितांना या एकाच घटनेने केवढेतरी खाद्य पुरविले आहे. कवी सरळ सरळ अधिक्षेप करीत तर केव्हा उपरोधपूर्ण शब्दात जाधव हीच भावना शब्दबद्ध करतात. त्यांची आणीबाणी १९७६ ची ही कविता या दृष्टीने पहाता येईल—

**आणीबाणीच्या नावाखाली जनतेच्या डोळ्यात**
**मिरचीची पूड फेकली**
**आणि सुपुत्रांनी तर**
**कलमी कार्यक्रमाच्या तुणतुण्याची तार छेडली**

किंवा '१५ ऑगस्ट १९७७' ह्या कवितेतील बेलछी प्रकरणाची नोंद; 'बलात्कार, बेकारी, 'भिकारी, कदाचित मेलेच तर या कवितांचीही अंतर्लय ह्याच स्वरूपाची आहे.

आत्मरूपाचा वास्तव शोध घेण्यातही जाधव कवी म्हणून जागरूक आहेत. त्यांनी 'स्व'रूपाची रेखाटलेली काही शब्दचित्रे प्रत्ययकारी आहेत. 'जातगंगा' मधील

हे आमच्या जातीचे वैशिष्ट्य
चार आण्याचा बेवडा पिऊन
दहा रुपायाचा तमाशा दाखविणे

या ओळी, किंवा 'त्राता' कवितेतील त्यांची भावना, रक्ताने माखलेली माती, जळजळीत निखारे, अफाट आव्हान, मायेचे पूत' व 'दलित' या कवितातील झुंजार पण समंजस आवेश जाधव यांच्या कवितांबद्दल अपेक्षा निर्माण करतो.

तरूण मनाला येणारी विषमतेची स्वाभाविक चीड जशी श्री. रमाकांत जाधव यांच्या कवितेत व्यक्त होते, त्याचप्रमाणे ह्या तरूण शरीराला व मनाला असलेली प्रेमभावनेची ओढही त्यांच्या कवितांत आढळते. पण आश्चर्य असे की हा सूर वैषम्यविरोधी सुरांपेक्षा क्षीण आहे. क्वचितप्रसंगी त्याची मांडणी त्यांनी उर्दू काव्याच्या ढंगाने केलेली आहे. व्यथा, सदाफुली, उदास, काव्यांजली, गीतगुंफा, भाव-शब्द ह्या कविता एखादी तरल भाववृत्ती पकडू पाहणाऱ्या, चैतन्यमय क्षणाला शब्दरूप देणाऱ्या आहेत. त्यातील शब्दांची निवड ही मात्र पारंपरिक व परिचित अशीच आहे.

' चांगी सुईण ' आणि ' माझी आजी ' ही दोन वेधक शब्दचित्रे आहेत. एकाकी जगणारी फटकळ चांगी, आणि तांबड टेकडीवरील आजीच्या सहवासातील क्षण श्री. जाधव यांनी समर्थपणे रंगविले आहेत.

श्री. रमाकांत जाधव यांना शब्दाची अचूक जाण आहे. यशाच्या हव्यासाने जीव पाखडत असताना आकस्मित आणि अकल्पित असे काही घडते. 'दुःखाने हाक मारली' ह्या कवितेत हेच सूत्र त्यांनी सांगितले आहे. आत्मशोधाची अनोखी नशा त्यांच्या 'मींच मला' या कवितेतून जाणवते. 'कदाचित मेलोच तर' आणि 'भटकंतीला निघालो तेव्हा' या कवितामध्येही त्यांच्या शब्दांच्या निवडीचा प्रत्यय येतो.

आपल्या हितगुजात कवीने आपल्या भूमिकेचे स्थूल दिग्दर्शन केलेच आहे. गलिच्छ वस्त्यांना काहीच देणे शक्य नाही म्हणून अर्पण केलेला हा काव्यसंग्रह 'चंदन' ह्या काव्यसंग्रहातून अनेकांचे ऋण आणि प्रेरणा स्वीकारून व मान्य करून कविताक्षेत्रात येणाऱ्या ह्या कवीशी, स्वागताच्या निमित्ताने प्रथम बोलण्याची मला संधी मिळली याचा मला आनंद वाटतो आहे. पहिल्या संग्रहात कवीच्या शक्तिस्थानाची ओळख पटणारी चिन्हे अनेक ठिकाणी आहेत. आणि सुजाण रसिकाना ती दिलासा देतील यात शंका नाही श्री. रमाकांत जाधव यांच्या या वाटचालीस मी मुक्त मनाने एवढेच म्हणतो ' आगे बढो दोस्त ! '

—केशव मेश्राम

# अनुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| अर्पण | ९ | जातगंगा | ३१ |
| आणीबाणी १९७६ ची | १० | कदाचित मेलोच तर | ३२ |
| चंदन | ११ | बलात्कार | ३३ |
| बेकारी | १२ | काव्यांजली | ३४ |
| भिकारी | १३ | स्वार्थी | ३५ |
| सदाफुली | १४ | चांदणे | ३६ |
| हेही तेवढेच | १५ | प्रेतयात्रा | ३७ |
| आंधळा नवरा | १६ | शब्दफुले | ३९ |
| त्राता | १८ | काळा गॉगल | ४० |
| उदास | १९ | मीच मला | ४१ |
| मुक्तशब्द | २० | माझे गांव | ४२ |
| मायेचे पूत | २१ | दलित | ४४ |
| १५ ऑगस्ट १९७७ | २२ | व्यथा | ४५ |
| चांगी सुईण | २३ | पातळी | ४६ |
| भटकंतीला निघालो तेव्हा | २५ | मला हवेत | ४७ |
| जळजळीत निखारे | २६ | माझी आजी | ४८ |
| गीत–गुंफा | २७ | रक्ताने माखलेली माती | ५१ |
| अफाट आव्हान | २८ | अंतर | ५२ |
| दुःखाने हाक मारली | २९ | भावशब्द | ५३ |
| मिणमिणता कंदिल | ३० | नमस्ते | ५४ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
शाखा

# अर्पण

गलिच्छ वस्तीपर्यंत
माझ्या कवितांची बोंबाबोंब
तुमच्या कानी येईल
की, मी केलाय अर्पण काव्यसंग्रह
जे आहेत—भरडलेले—नाडलेले—छळलेले,
जे आहेत—उपाशी पोटी—
अन्नासाठी वणवण भटकणारे बेवारशी
जे आहेत उघडे नागडे
दीन—दुबळे
त्यांना मी काय देऊ शकतो ?
मीच,
होतोय पगाराच्या दुसऱ्या—तिसऱ्या,
दिवशी कंगाल.
"मी शोधतोय तुमचा सूर"
जो मी काव्यात जपून ठेवलाय
केवळ तुमच्यासाठी..........

# आणीबाणी १९७६ ची

दिल्लीतल्या शासन-कर्त्यांनी
तीस वर्षे गंजलेल्या खुर्चीवरून
आणीबाणीच्या नावाखाली
जनतेच्या डोळ्यात मिरचीची पूड फेकली
आणि........
सुपुत्रांनी तर
कलमी कार्यक्रमाच्या तुणतुण्याची
तार छेडली
बुवा बायांना जमवून
नसबंदीचा बहुरंगी तमाशा मांडला
शासन प्रमुखांनी तर कहरच केला
काळे पुसून पांढरे करण्याचा
खादीधारी लोक
काळरुपी कोंबड्याला झाकू पाहात होते
पण काळाने योग्य वेळी बांग दिली
मला फक्त एकच आठवतय
अब्राहम लिंकनचे लोकशाही विषयी उद्‌गार
'अहो लोकशाहीचे उपासक हो;
'यु कॅन डिसीव्ह
ऑल दी पीपल फॉर सम टाईम;
सम पीपल फॉर ऑल दी टाईम
बट
यु कॅन-नॉट डिसीव्ह
ऑल दी पीपल फॉर ऑल दी टाईम.'

# चंदन

चंदनाची झाडे
मानवासाठी
निसर्गाने पैदा केली;
पण मानवाला फारसा उपभोग
मिळालाच नाही.
आपला देह सुगंधी असावा
हीच इच्छा!
पण चंदन--
घ्राणेंद्रिये नसलेल्या आत्मतृप्त देव-देवतांसाठी;
आणि नरक आपल्यासाठी
असतील!
मलय पर्वतावर नाना-तऱ्हेची सुगंधी झाडे;
आम्ही आहोत उन्हात पोळलेली झाडे;
आमच्याच मूर्खपणाच्या काटेरी फांद्या
पाने फुले नसलेल्या.
कसला चंदन आणि कसला सुगंध!
चितेवर शेवटी दुरुनच-फेकतात
चिमूटभर
तेव्हा आम्ही असतो आगीच्या स्वाधीन
कुठले घासलेट आणि कुठले चंदन!

# बेकारी

बेकारीत
चंद्रावर सफर करतांना
मीही घासलीत
प्रत्येकांची दारे
प्रत्येकांची तोंडपाठ–आश्वासने ऐकली
कुणाचा
पोलादी होकार आला नाही.
अपयशांची बेरीज करतांना
ओळखींच्या पायऱ्यांचे
सीमेंटही गळून पडले.
दरवाज्यांची बीजाकडी
तीही खिळखिळीत झालीत.
कदाचित
मला पाहून
रस्त्यावरचे दिवेही थकले असतील
आज
बस–थांब्यावरचा
भिकाऱ्याचा पोरगा
सकाळीच सलाम ठोकून
पांच पैसे उकळतो
तेव्हा
बस–थांब्याजवळची
रस्त्यावरील गटाराची जाळी
मला पाहून हसते
ती
मला भकास वाटत होती
बेकारीत–चंद्रावर सफर करतांना.

# भिकारी

अहो लोकशाहीचे उपासक हो,
या
बेवारशी फाटक्या–तुटक्या रोगीट
भिकाऱ्यांचे दिवस येतील काय ?
बाया जाऊन बुवा आले
आणीबाणीत;
भिकारी हटावाची मोहीम आली;
भिकाऱ्यांची छाती फुगून गेली.
ते नेहमीच शोधणार आहेत
तुमच्या ताटातले उष्टावलेले अन्नकण.
सडलेल्या अन्नासाठी भटकताना
त्यांची झोळी नेहमीच रिकामी राहाणार आहे.
त्यांना ठाऊक असून
ते आता तुमच्या दयेची
याचना करणार नाहीत;
आणि हो,
आता त्यांनी सवय करून घेतली आहे
उपाशी पोटी कित्येक दिवस
उघडी पुलाखाली झोपण्याची....

# सदाफुली

जेव्हा तळहातावरील फोड
जपला होता फुलागत
सुरक्षित राहावा म्हणून
तेव्हा हात कुणाचा मागावा
हातच जेव्हा सडलेले असतात.

# हेही तेवढेच

ही सागराकाठची गावे,
मीहि खाडी काठचा,
मी माझ्या जीवनाची सुरुवात केली तेव्हा
या सागराला तुफान भरती होती.

माड–पोफळीची झाडे
आडवी–तिडवी होत होती,
पलिकडच्या काठावरून
निरोपाचे हात देखील
काहीसे पुसट दिसत होते;
फक्त एवढच आठवतय.

पलिकडचा फक्त पूल सोडला तर
ह्या झोपड्या होत्या तशाच आहेत;
हा उभा जन्म—
मुंबईचे खारे अधिक गोडे वारे पिण्यात घालविले.

असे असून देखील
खाडीच्या काठावरील
कुबट विचार
पुसून टाकू शकलो नाही
हेही तेवढेच अखेर कटुसत्य आहे.

# आंधळा नवरा

किती दिवस झाले
तरी नाकात घुमतोय
अत्तराचा वास,
बांगड्यांची किण-किण,
'कोण आहे?'
वीणा आली असणार!
'तुझे हात आज उबदार,
सुगंध दरवळलाय.
तुझा गजरा
तो देखील
आज जास्त माळलाय.'
'कसं ओळखलंत तुम्ही?'
'तू अजून तशीच आहेस
फक्त वास बदललाय
तुला लवकरच परत जायचय,
होय ना?'
अशा अवेळी कुणाची शीळ?
'जाना!'
किती जळजळीत अश्रू
कळतंय आता आपोआप
उभी फाट्यासारखी
जळणार आहेस.

कुणाची शीळ ?

'जाना !'

समाज–सोसायटी

त्यांची झडलीय जीभ

चंदेवाईक

देणार आहेत कां एक वेळचा उसळपाव ?

परत एकदा गजरा माळवून ये

आता मात्र

तुला प्रत्येक रात्री गजरा माळवावा लागेल.

# त्राता

युगानु-युगे
भरडलेल्या-नाडलेल्या-छळलेल्या
दीन-दुबळ्यांचा त्राता बनलास
निस्वार्थपणे
त्यांच दुःख ते
आपलच समजलास
तुझा संसार जाळून
इतरांचा फुलवलास
त्यांच्या हक्काची जाणीव केलीस
त्यांच्या फलटणींचा सेनापती झालास
लढण्यासाठी निकराने !
तुझ्या विद्वत्तेपुढे
इतर नतमस्तक होऊन
चळचळा कापत
तुझ्या दीन-दुबळ्यांना
पहाटेच्या सूर्याचे दर्शन दिलेस
आज ते तुझ्याशिवाय
निराधार आहेत
आज तुझ्या पश्चात
देशाच्या तिसाव्या वाढदिवशी
तर त्यांना जाळू पहात आहेत
आता त्यांच्यातले सगळेच स्वार्थी झालेत
आणि हो !
सगळेच प्रति आंबेडकर होऊ पहात आहेत
मला फक्त एकच कळतय
आता आंबेडकर होणे नाही.

# उदास

फेसाळलेल्या समुद्रात
मी झालोय लाकडी ओंडका
उचाळतोय–आदळतोय
तुफानाच्या तडाख्यामुळे
'कुठल्या किनारी जायचं ?'
हा एकच प्रश्न.
या अपयशी जीवनावरती
उदास-काव्य
मीच रचतोय;
तेव्हा पाषाणातील देव तरी
येईल कां गहिवरून ?

# मुक्तशब्द

जो तो आपल्याच प्रवाहात
गढलाय.
        कुणी कुणाचं उरलंच नाही
कुणी कुणाला आपलसं
करण्यात काय फायदा ?
कुणाचा कुणाला भरवसा नाही
जाणारी चिंता निघून गेली.
येणाऱ्या आनंदाचा
काय भरवसा ?

# मायेचे–पूत

कशासाठी एवढा खटाटोप ?
गाडून टाका सगळेच
बुरसटलेले धर्म–संस्कार
गुलाल–धूप–अबीर
अत्तर–फुलांचे हार
आणि........
ते कोरं करकरीत कफन
आधीच बेवारशी
खानदानीने–समाजाने–सगळ्यानीच
वाद्यात काढलेला–भिकार–लफंगा
कधी गेले होते का ?
मायेचे पूत
तो मरणाशी झुंज देताना ?
कधी गेला होता का,
सहकार्याचा पोलादी मायाळू हात ?

# १५ ऑगस्ट १९७७

आमच्या महान देशाच्या
तिसाव्या वाढ-दिवशी
बेलछीला
माजलेल्या
हरामखोर जमीनदारानी
अकरा जणांना जीवंत जाळले
चौतभर जमिनीच्या तुकड्यासाठी
घोटभर पाण्यासाठी
तुम्ही रक्त सांडताय
हरिजन हे देखील तुमचेच बांधव
ते देखील, देशाच्या रक्षणासाठी
स्वतःहाचे रक्त सांडवत आहेत
पण
तुम्हाला कळेल तेव्हा ना
अहो
इतिहास ओरडतोय
ते तर या देशाचे खरे वारसदार
ते आता निग्रो होऊ पाहात आहेत
शेवटी काय ?
आपण
सगळीच सळसळणारी वादळातील पाने
शेवटी आपली मातीच व्हायची.

# चांगी सुईण

ती
चांगी सुईण
वास्तविक एक खाडीच होती
माझ्या गांवची.
भर उन्हात–उष्टी खरकटी साफ करून
शिळे पाके जमवून
गांवाबाहेर
माडांच्या सावलीतल्या
झोपडीत येऊन धूर करायची
माडाच्या बाजूला–केळीची पाने डुलत रहायची.

गावातल्या अडलेल्या
बाळंतीण बायांना सोडवायची.
अचानक बेरात्री काम निघालेच
तर
माडाच्या बुंध्याजवळची माती कपाळी लावायची.
काहीतरी पुटपुटत
बाळंतीणीला जीवदान द्यायची

खरं पाहाता होतीच मुळी बेवारशी
निरवार्थी म्हातारी.
मराठमोळ्या–साळी–माळी–महार–चांभार मांग–ढोर
सगळ्यांच्याच कामी यायची.
तिचे कांही दुखले-खुपले तर
माडाच्या बुंध्याजवळ अबीर गुलाल टाकायची,
भूतकाळच्या गोष्टी काढीत
सग्यासोयऱ्यांना शिव्यांची लाखोली वहायची.

एकदा काय झाले,
भर दिवाळीत
बाळंतीणीला सोडवितांना
बाळंतीणच मेली.
म्हाऱ्यांनी चांगीला लाथांनी तुडवली.
ती एकदाच ओरडली,
'रंडकिच्यानो!
चांगलं केलं तर देवान केलं!
वाईट केलं तर माणसानं केलं!'

मी आता कधी तरी
गावाला जातो
तेव्हा ती झोपडीजवळची
केळीची पाने तोऱ्यात डुलत असतात;
पण
झोपडीतून धूर येत नाही.
आणि हो! चांगीच्या
झोपडीतला तो पसारा
अजून तसाच उघडा आहे.

# भटकंतीला निघालो तेव्हा

वळकटी घेऊन जेव्हा निघालो
माणुसकीच्या जग प्रवासाला
तेव्हा रस्त्यावरच्या मिणमिणत्या
दिव्याना साक्षी ठेवून
निनावी गावाची सीमा ओलांडली;
तेव्हा चिट-पाखरु नसलेला काळोख
मधूनच कुत्र्यांचे भुंकणे मात्र
बेसूर वाटत होते
अशाच मध्यरात्री
समुद्रकाठी लाटांना साक्षी ठेवून
पुकारलो मी
'मला माणुसकी विकत मिळेल काय कोठे ?'
कुणी हाक मारली मला ?
छे! वादळ-वादळ सुटलेय !
वादळाची भेडसावणारी हाक
पुन्हा एकदा
माझा प्रश्न
'मला माणुसकी विकत मिळेल काय कोठे ?'
सारखेच उत्तर
टेप केलेले,
'पुढच्या स्मशानात जाऊन पहा.'
भटकंतीला निघालो तेव्हा........

# जळजळीत-निखारे

आमच्या दडपलेल्या-हिणलेल्यांच्या
चुका तुम्ही भर न्यासपीठावरून सांगा;
नाहीतर हिणवणाऱ्यांच्या
वर्गाचे सूर मी तरी सांगतो.
काळे पाहून पांढरे व्हायची सवय सोडा.
आता माझी तयारी आहे
आग पाहून जळजळीत निखारे व्हायची.

# गीत-गुंफा

जाणून घे

          जाणून घे

चौतभर तुकड्यासाठी

मी तुझ्या दारी आलोय;

          तुकडा नसेल तर विष तरी

तुझ्या फाटक्या पदरात गाळून दे.

# अफाट-आव्हान

ही तर चालती-बोलती माणसं
झुकली आहेत दुःखाच्या ओझ्याखाली.
त्यांच्या अंतर्यामी झिजतेय यातना.
भीषण विषमता त्यांच्यावर काळोख्या
रात्री सारखी पसरलीय.
ते झालेत खाजणी-चिखलातले
वळवळणारे किडे.
मी बघतोय वाकून-लवून
त्यांच्या तोंडावरचा
हजारो वर्षाचा काळोख.
त्यांनी कधी अनुभवलाच नाही
पौर्णिमेचा चंद्र.
त्यांनी शोधून काढलीय, काटेरी वाट.
आम्ही त्यांना रेडिमेड डांबरी
रस्त्याची आश्वासने देऊन ठेवतोय.
ती चालली आहेत
लाव्हारसाच्या समीप.
त्यांची स्मशानाची सफर
माझ्या सारख्या दुबळ्यांना
अफाट-आव्हान
देऊन राहिलीत;
अफाट-आव्हान
देऊन राहिलीत........

# दुःखाने हाक मारली

फिरत होतो एकदा
काटेरी वाटांतून
पायाखाली घालत होतो
रानेच्या राने.
अपयशांची शबनम बॅग
गळ्यात टाकून.
वाटत होते वेड्या मनाला
कधीं तरी परतेन
यशाची शबनम बॅग भरून.
पण—
भूतकाळाची आसवे देखील
पुसली नव्हती
तोच आडव्या वाटेवर
दुःखाने हाक मारली.

# मिणमिणता-कंदिल

तो कंदिल तसाच असू दे मिणमिणत
आमचे अस्तित्व असल्याची खूण.
येणाऱ्यांना डोळे असून आंधळे असतील
शारीरिक भूकेच्या पोटी अतृप्त वासनांचे थवे
शरीराचे हलकेच हेलकावे
कैक जणांची प्यास बुझवतोय आमच्याच उदरात.

भरभरून श्वास घेतला मात्र
नाका तोंडातून कचकचत गेला
वासनांचा मळकट वास.
मनात येईल ते ते...........
गाऊन दाखवावे-शरीराची विक्री करून.
काळोख म्हणजे काय ?
या प्रश्नाने सुरुवात केली
आणि इथे पोहोचलो.

घराचे रस्ते कधीच संपलेत.
साकळलेले-कोंदटलेले-गुदमरलेले मन
पुन्हा एकदा रडले मात्र
आणि मग मात्र सरळ
आठवणीत रुतून बसलाय
कधी एकदाचा उजेड;
पण उरेल शेवटी
उघडा-बोडका-बाजार
काळहीन जीवन किनारा
अजून खूप रात्री येणार आहेत.
तो कंदिल तसाच राहू दे मिणमिणत
आमचे अस्तित्व असल्याची खूण.

# जातगंगा

प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेला
आमच्या जात-गंगेत धुमाकूळ असतो
पगारवाल्यांचा
मी चाळीच्या दाराशी रात्री येताच
पुढील श्लोक........
आ....वा........ज.
है ! कोई माँका लाल ?
मी लखुच्या आयला........
तोच दुसरा
मै सोमा दादाके........चाकू डालेगा
तोच तिसरा
नामीची आय माका ग्यान पढवते
तिच्या....खाली आरी....चांभार पोराला मारी
भिक्या दादाला हाणला
लय वळवळते त्याची
एक आर्त-किंकाळी-गर्भारणीच्या पोटावर लाथ
माझ्या सारखे सगळेच माना
खाली घालतात.
हे आमच्या जातीचे वैशिष्ट्य
चार आण्याचा बेवडा पिऊन
दहा रुपयाचा तमाशा दाखविणे
आता मात्र सामसूम आहे
पुढची दहा तारीख येईपर्यंत
पुढची दहा तारीख येईपर्यंत

# कदाचित मेलोच तर...

कदाचित मेलोच तर
हळहळू नका;
सगळ्यानीच बदनाम केलय
कुटुंबात–गावात–खानदानीत
नाठाळ–भिकार–काफर–कवी
कुणीच आले नव्हते
आसपास
अपयशांच्या पायऱ्या झिजविताना
कुणीच झळकले नव्हते
जेव्हा बेवारशी रुजू झालो होतो–तेव्हा
मानेखाली हात देण्यासाठी,
माझ्या मर्तिकाला,
खांदा देण्यासाठी सज्ज असाल,
पण त्या आधी
मी महापालिकेत
बेवारशी म्हणून नोंदणी केलीय.
कदाचित मेलोच तर....

# बलात्कार

तुझ्यावर अमानुष बलात्कार केलेल्या
राक्षसांविषयी ऐकले;
तुझ्या नेस्तनाबुद झालेल्या जीवनाविषयी
वृत्त मी वाचले;
राक्षसांना लोखंडी गजातून सुटका
केलेल्यांना स्वतः मी पाहिले;
बेचिराख-पोळलेल्या जीवनातून
तू वाटचाल करताना
आमचे मदतीचे हात आखूड झाले.

# काव्यांजली

काल चांदण्या रात्री—त्या माळरानावर
यायला नको होतीस–जाताना बेधुंद करून गेलीस
आणि........
आज मी मात्र
त्या धुंदीच्या खुणा पाहात असतो
तेव्हा त्या चांदण्या हसत असतात
पण—
पौर्णिमेच्या रात्री चंद्र येईल
त्याला काय सांगू !

# स्वार्थी

या स्वार्थी जगात
होऊच शकत नाही
दीन–दुबळ्यांचा त्राता
कुणाचा नेता-कुणाचा भाई–कुणाचा बाबा
निःस्वार्थपणे झिजणारा
चंदनासारखा.
सगळेच निघालेत
आपण आणि....
आपल्या रित्या घागरी भरायला.

## चांदणे

दिवस नसता तर
अंधारात चाचपडलो असतो
पण........
रात्रीचे चांदणे पिऊन
दिवसा रडलो तरी नसतो.

# प्रेतयात्रा

दणक्यात निघायला हवी माझी प्रेतयात्रा
आणि यायला हवा त्याचा फोटो मोठ्या पेपरात.
याच
माझ्या खांद्यावरून
अन्न—अन्न करीत वाहून नेऊन
जाळून आलोय
सगळी पिढी
फक्त उरलोय शेवटी एकटाच
दणक्यात निघायला हवी माझी प्रेतयात्रा
आणि यायला हवा त्याचा फोटो मोठ्या पेपरात
शेवटी एवढीच इच्छा.
अहो पण फोटो नाही कधी आयुष्यात काढला
आठवतंय एकदा !
आला होता
वरळीच्या दंगलींत माझा भाऊ हुतात्मा झाला होता तेव्हां
त्याच पेपराच्या कोपऱ्यात
काळा ठिपका दिसतोय ना—तोच मी
वरळीच्या डोंगरावर जे मेणकापडाचे छप्पर दिसतेय ना
तेच माझे घर
मागच्या होळीला जमविला होता गुलाल वर्गणी काढून
तोच बरा तोंडाला फासायला
आणि हो मागच्या
गणपती विसर्जनाच्या वेळी
कागदी आणि चंदनाच्या चुऱ्याचे हार

जमविले होते तेच बरे
म्हणजे कोमेजणार नाहीत
प्रश्न असेल तुमचा खातो काय ?
खातो कधी तरी उसळ पाव
पण नेहमीच शोधत असतो
रस्त्यावर सडत पडलेल्या—केरकचऱ्यातील अन्न कण
माझी एक अट मात्र
चितेला चूड लावण्या आधी
अन्नाची गोष्ट काढू नका
कारण अन्नामुळेच चितेवर चढावं लागलंय.
कारण अन्नामुळेच चितेवर चढावं लागलंय.

# शब्द-फुले

ये अधुऱ्या पावसा
        जरा थांबत ये
माझ्या शरीराची
        वर्षभर झालेली आग बुझविण्यासाठी
किती आतुरलेय मी
        एवढा बरसू नकोस
की तू पुन्हा बरसू शकणार नाहीस
आणि
खरच आलास माझ्या बाहुत
तर एवढा बरस....
एवढा बरस....
की पुन्हा जाऊच नकोस

# काळा–गॉगल

विपुल झुडपे,
असंख्य लांब काटेरी फांद्या;
प्रत्येक झुडपाखाली
निनांवी उभा
दुःख हलकं करावं
पण कुणाजवळ ?
सगळेच अनोळखी.
ते आता
म्हणतायेत आम्ही दुःखी माणसांना ओळखत नाही.
कारण आतां त्यांनी प्रकाश
न दिसणारा काळा गॉगल घातलाय.

# मीच मला

कुणासाठी करावं असं म्हणताय ?
कुणासाठी थांबावं असं म्हणताय ?
सगळेच माझे माझे म्हणणारे
ते देखिल
अर्ध्या रस्त्यावरून परत फिरलेत
मी माझी मंझिल गाठतोय
स्वप्नांची
साक्षात काहीच नाही
मीच मला पाहातोय
मीच मला खातोय
मीच मला पिळतोय
आणि मीच मला
गाडतोय.

# माझे गांव

तसे पाहिले तर
माझे गाव म्हणून मला वाटतच नाही....
निःस्वार्थी असा एकही चेहरा दिसत नाही..

तसे मधून-मधून दिसत होते-म्हणा
महात्म्यांच्या गोष्टी करणारे
सफेद टोपीखाली व्यवहार घडविणारे
आपली टोपी भरून झाल्यावर
दुसऱ्याची रिती करणारे
आजही अस्तित्वात आहेत

असेही महाभाग आहेत
एकाचीच थुंकी झेलणारे
दुसऱ्याचा कर्ता बैल
मेल्यावर पेढे वाटणारे

कदाचित असतीलही
मला हवे असलेले चेहरे?
पण! ते दबलेत-कुणाच्यातरी दबावाने
असतील का!
माझे त्यांचे एक गाणे

जे काही उरलेत
त्यांना मी आता उद्वेगांची

गीते ऐकविणार आहे.

कुणी सांगावे !

त्यांच्यातीलच काही सबकुछ झालेले पाहीन

तेव्हा गांव

माझे झालेले असेल

जमलेच नाहीतर

कुरतडत श्वास घ्यावा लागेल
गावावरून अखेरची नजर फिरविताना
धाप लागलेल्या
म्हाताऱ्यासारखी

# दलित

तू एक दलित
अन्याय अत्याचार करून घेत आलास
स्वतःवर त्यांच्याकडून
लाखो वर्षापासून चिरडून–छळून घेत आलास
धुमसत ठेचला गेलास
कुत्र्यासारखा जगत आलास
पाणी–पाणी–पाणी करीत
हिंडतो आहेस अनवाणी माणुसकीच्या शोधात
गळी बोळातून तुटलेल्या पतंगासारखा
पण तुला निळं आकाश दिसलंच नाही
कारण तुझी दोरी त्यांच्या हातात होती आजपर्यंत
अंधार सोसायला हवा पण किती ?
तुला अजूनही वाटताहेत आदर्श
धर्माच्या मुखोदूगत दोन ओळी
अस्तित्वाखाली केव्हाच पेरले गेले आहेत
अधर्माचे सुरूंग—
मरता येत नाही म्हणून जगणे
म्हणजे जीवन नव्हे
तू सदा–सर्वदा सजग सावध रहा
हातातील नग्न धारदार कुऱ्हाडीने
तोडीत जा–छाटीत जा प्रत्येक वांडगूळ
रक्ताने इतिहास लिहीत जा
तुला दाखवलेल्या मार्गाने
बहुजन–हिताय !
बहुजन–सुखाय !!

# व्यथा

नाही फुरसत–नाही शांती
नाही मिळाली–नाही मिळणार
मला
आराम कधीचा.
मी एक मुसाफिर आहे.
माझी सकाळ केव्हाची
सायंकाळ कधीची.

# पातळी

तुमचे रक्षणकर्ते पुढारी म्हणताय ?
ते होऊच शकत नाही–तुमचे वाली
त्यांची रक्षाच फक्त
कपाळी लावायची बाकी आहे
कोण येणार आहे तुमच्या मदतीसाठी
इथले–राज्यकर्ते म्हणताय ?
ते नेहमीच बिझी कोनशीला बसविण्यात
त्यांतच पेपरवाल्यांची गर्दी
मुखपृष्ठावर कोनशीलेचा समारंभ छापण्यात
इथले राजकीय पक्ष म्हणताय ?
ते सगळेच भोळेपणाचा फायदा घेणारे
फक्त
झुणका–भाकरीची आश्वासने देणारे
शेवटी स्पष्टच सांगतो
तुम्हालाच गाठायला हवी
आर्थिक–शैक्षणिक–सामाजिक
पातळी
कुणी सांगावे एके दिवशी
तुम्ही सगळेच सबकुछ झालेले असाल
जमलेच नाहीतर
कुरतडत मरावे लागेल धाप लागलेल्या म्हाताऱ्यासारखे.

# मला हवेत...

हसण्या खिदळण्याच्या वयात
झिजवत होतो प्रत्येक दारे
शिक्षण व नोकरीसाठी.
मौज–मजा करण्याच्या वयात
एक–एक प्रसंग निभावीत होतो
कुणाला सांगू माझी गाथा
इथल्या गर्दीतल्या माणसांना ?
छे ! ते झालेत आंधळे–डोळे असून
कुणाला....कुणाला....सांगू
इथल्या दिवसाला !
इथल्या रात्रीला !
मला हवेत दिवस
शिक्षण देणारे
मला हवेत दिवस
भाकरी देणारे
मला हवेत दिवस
निवारा देणारे
मला हवी आहे रात्र
माझ्या रुल्या–सुल्या हातात
ओलसर मायेचा ओथंबलेला हात देणारी
मला हवीय रात्र
माझ्या दुःखावर फुंकर घालवून–कुरवाळणारी....

# माझी आजी

माझ्या आजीची
माझ्यावर भारीच माया
माझी देखील
भर दुपारी रणरणत्या उन्हात
रानात काटेरी वाटा तुडवत-तुडवत
फाटी आणायला जायची

मी शाळा सुटताच
दप्तर एका कोपऱ्यात
फेकून तिच्या परतीच्या वाटेवर
तांबड टेकडीवरील मोठ्या दगडावर तासन-तास
उभा राहून तिची वाट पहायचो

इतक्यात बऱ्याच लांबवर
'रेघी' नांवाची कुत्री आजी आल्याची चाहूल द्यायची
तोच तिच्या डोईवरची मोळी
दिसताच मला बरे वाटायचे

माझी आजी
तांबड टेकडीवर येताच
मला प्रश्न
पोरा शाळेत गेला होतास ना ?
मी हो म्हणायचो
ती देखील तिथे धाप टाकीत मोळी उतरून
विश्रांती घ्यायची
मला जवळ ओढून-काट्यांनी बोचलेला चरचरीत
हात मायेने फिरवायची
तिच्या घामेजलेल्या जुनेराच्या पदराने

माझेही तोंड पुसायची
मला ओटीत हात घालून
कधी बोरे
तर कधी करवंदे अथवा बोकेरीची फळे
हातावर ठेवायची

मला या क्षणी परमानंद व्हायचा
अशावेळी
हळूच तिच्या मोळीतील
दोन-चार मोठी लाकडे अलगद काढून घ्यायचो
ऐटीत खांद्यावर टाकून
मी पुढे- आजी पाठीमागून यायची

फाट्यांची भारी घराच्या आवारात टाकताच
माझी आजी
पाणी उदग करायची
तेवढ्यात मीही चूल पेटवून मोकळा व्हायचो

रात्री तांदळाच्या-भाकऱ्या शेकवितांना
भाकरीचा वास येताच-अभ्यास सोडून
चूलीजवळ यायचो-आजी ओरडायची
ढगांचा गडगडाट व्हावा तसा
परत पाटी पुस्तकांची उघड-झाप करायचो
हळूच अभ्यासाच्या जागी यायची-मायेने भाकरी
द्यायची-

पुढे मीही मुंबईच्या खुराड्यात पोहोचलो
पदवीधर होताच-तिच्या डोळ्यात आनंदाश्रू चमकले
कापत-कापत म्हणाली-पोरा शिकून मोठा हो
पण गावाला विसरू नको
मीही हो म्हणालो

पुढे तीही अशक्त होत चालली—रानात भोवऱ्या—आलेल्या
पायाकडे बघून—गतकाळच्या गोष्टी गिरवू लागली
मीही अधून—मधून गावाला भेटत असे
मायेचा हात फिरवित असे
सीताफळे—बोरे—करवंदे—फणस—आंबे
नको—नको म्हणतांना पिशवीत कोंबीत असे.
एस. टी. स्टॅण्डवर निरोप देतांना
डोळे पुसत असे.

एकदा अचानक तार धडकली
आजी सोडून गेली
आता कधी तरी गांवाला जातो
तेव्हा
तांबड टेकडीवरच्या उंचशा दगडावर
बसून समोर तासन्‌तास परतीच्या
वाटेकडे पहात असतो
गतकाळ आठवत असतो
तेव्हा मोळी दिसत नाही
खिन्न मनाने खाली उतरतो
परत पाठीमागे वळून पाहतो
तेव्हा
परतीची वाट अंधूक दिसते
तांबड टेकडी- जास्तच तांबूस झालेली वाटते.

# रक्ताने माखलेली माती

2334 काव्य
दा.क्र. 22964

तुझी
भर दिवसा या हरामखोरांनी,
खुल्या मैदानात,
नागडी वरात काढली,

शुभ्र पातळ नेसणाऱ्या,
तुझ्या आयाबहिणींना
तुला उघडे पाहाण्याची संधी मिळाली,

तुझ्या रक्ताने माखलेली माती
पाहूनही
आमचे रक्तच मुळी सळसळत नाही,
हेही तेवढेच खरे आहे.
कारण.... आम्ही म्हणतोय--
आमची कुणीच लागत नाहीस.

आम्ही सगळेच बनलोय
टांग्याच्या घोड्यासारखे
एकाच दिशेकडे पाहाणारे
पण........
आता मात्र रहावत नाही.

म्हणूनच........
इथून पुढे मीही ठरवलय
या आया–बहिणींना उघडे करण्या आधी
कुऱ्हाडीला धार काढून ठेवतोय
कारण........
हे कधी–तरी थांबायलाच हवं........

## अंतर–

अजूनही जपत होतो
सूर्यकुलातील
पुत्रांचे विचार
बंदिस्त शिंपल्यागत........

काल परवा पर्यंत
साक्षात जीवनरुपी किनाऱ्यावर
येताच
मनुस्मृतींची पिढी बडबडत होती

त्याचक्षणी
सुर्यपुत्रांची कुपी सोडून दिली
आणि आज जेव्हा
वाळवंटावर आलो
तेव्हा सूर्याचे तेज
झळाळत होते.

तेव्हा त्यांच्यातलेच कुजबुजत होते.
तो— ढोर
तो— चांभार
तो— मांग

# भावशब्द

नदीच्या पुरासारखी
स्मशानात येऊन

जेव्हा ओंजळभर फुले
समाधीवर ठेवलीस

अखेरची स्मृती म्हणून
पण........ अचानक
सोसाट्याचा वारा येऊन
सगळी फुलेच उधळून गेली

तेव्हा
स्मशानातल्या
वडावरचा

कक्रकुंभा (पक्षी)
जोरजोरात
चित्कारत होता
कक्र्-कु-कक्र्-कु

तुझ्या जाणाऱ्या पाठमोऱ्या
आकृतीकडे पाहून
हे तुला कधी उमगेल का ?

# नमस्ते

मी मुंबईतल्या गल्ली बोळातून
फिरताना
धर्म– जात– वर्ण– खुंटीवरच ठेवतो
शबनम बॅगेत फक्त माणुसकी घेऊन फिरतो.
दिसतील त्यांना नमस्ते करतो
नाहीतर काय !
आपण सगळेच पाण्यावरील कागदी नावासारखे
शेवटी जगलो त्याचा जमाखर्च तो काय ?
तुमच्या इराण्याच्या हॉटेलमधील ऐकविलेल्या कविता
आणि
दिसतील त्यांना केलेले नमस्कार................

२३३५ काव्य
दा. क्र.
२२१६५

# काव्यसंग्रहा विषयी :

मी काही नामवंत कवी नाही. काव्याच्या प्रचंड वास्तूत पाऊल ठेवणारा मी एक नम्र प्रवासी आहे. या घडीला माझ्या काव्यरुपी कोंबड्याची बांग झाली आहे. खरा सूर अजून लागायचा आहे.

मी हे जे लिहिले आहे त्यात माझा स्वानुभाव गाठीला आहेच दुसरी गोष्ट म्हणजे मी चालू सामाजिक परिस्थितीचे चित्रण प्रामाणिकपणे काव्यात गुंफण करण्याचा प्रयत्न केला आहे. हे आपल्याला माझ्या काव्यात दिसून येईल.

उदा. चंदनातील कविता :– आणीबाणी, भिकारी, अत्याचार, दुःखाने हाक मारली, प्रेतयात्रा, अंतर, हेही तेवढेच, मिणमिणता कंदिल, बलात्कार, इत्यादी.

ही प्रत आता तुमच्या हाती आल्यानंतर तिचे मूल्यमापन कसे करावयाचे हे तुम्ही ठरवा.

## काव्याशी दोस्ती :

मी काव्य लेखनास खऱ्याखुऱ्या अर्थाने सुरुवात केली ती १९७२ साली.

त्या आधी मी काव्यलेखन करीत असे, जेव्हा मी हायस्कूल मध्ये होतो, तेव्हा छोट्या – छोट्या कविता करुन चांगल्या वाटल्या नाहीत म्हणजे फाडून टाकीत असे, तेव्हाचे दिवस मला आठवतात ते म्हणजे मी दुपारनंतर माझ्या गावाला गुरांना घेऊन रानात चरावयास नेत असे, गुरे माळरानावर चरावयास सोडल्यावर एक चांगलीशी ओढ्याजवळची जागा बघून जरा उंचशा दगडावर बसून निसर्गाचे निरिक्षण बारकाईने करून झाल्यावर माझ्या खिशातली अर्धी पेन्सिल आणि कागद तर नेहमीच असायचा आणि मग काय विचारता बालिश कवी मन जागृत होऊन दोन चार कवितेच्या दणक्यात ओळी लिहीत असे. अशा वेळी मला नेहमीच वाटायचे ह्या दोन-चार ओळी गुरुजींना दाखवाव्यात आणि एक दिवस माझ्या कविता गुरुजींना दाखविल्या पण मला वाटले नव्हते कि, गुरुजी असे फटकळ उत्तर देतील ! ते म्हणजे असे, ‘अरे जाधवा कविता ऐवजी अभ्यासाला तेवढाच वेळ दिलास तर नापास होणार नाहीस’ मला देखील त्यावेळी गुरुजींचे फटकळ उत्तर बरोबर वाटले, पण माझे मन मला स्वस्थ बसू देईना.

पुढे कॉलेजात आलो आणि माझ्या कवी मनाने चांगलीच मजल मारली हायस्कूल पासूनची जी तळमळ होती ती साकार झाली.

कॉलेजमधल्या काव्यस्पर्धा, सार्वजनिक संमेलने, कॉलेजच्या मासिकातून व इतर मासिकातून माझी कविता बोलू लागली. अशा तऱ्हेने छोट्या – मोठ्या कवी सम्मेलनातून हिरीरीने भाग घेऊन माझ्या मनाला एक वेगळेच आत्मिक समाधान मिळत असे.

कामावरून रात्री घरी आल्यावर कविता मला झोपू देईना, कवी–कवीतर मी माझ्याच मूडमध्ये असल्यावर रस्त्यातून चालताना देखील कविता बडबडत असे. रात्री बी. कॉम. चा अभ्यास करण्याऐवजी कविताच सुचत.

## प्रक्षोभक सूर गवसला :

कवी– मर्ढेकर– विंदा करंदीकर– मंगेश पाडगांवकर– अनिल– शान्ता शेळके.

अशा नामवंत मंडळीचे काव्य मन लावून वाचीत असे.

तरी देखील अंतर्मन वेगळ्याच कवितेने झपाटले होते. मला जो सूर हवा होता तो गवसत नव्हता. तो सूर मला कांही झोपू देईना जो सूर मी शोधत होतो.

कवी नारायण सुर्वे– नामदेव ढसाळ– दया पवार– ज. वि. पवार– अर्जुन ढांगळे– प्रल्हाद चेंदवणकर– यांच्या काव्यातून गवसत होता. जो सूर मी सारखा शोधत होतो, त्या सूराशी माझा सूर मिळता जुळता आहे असे राहून–राहून वाटू लागले.

तो सूर एका वर्गाचा नसून तो सूर सगळ्या वर्गाचा आहे. जे नागडे आहेत, जे अनवाणी माणूसकीसाठी भटकत आहेत. जे चिरडलेत. जे जळताहेत. जे भरडलेत जे आपल्याच भोवती फिरत आहेत, रोटीसाठी, ज्याने हे पोट दिले त्याने देण्याआधी पोटाचे मेजरमेंट काढण्यात काहीतरी चूक केली आहे असे राहून–राहून वाटते.

## माझ्या काव्याचा कल :

मला सतत वाटत राहत की, आपण या जीवनरुपी आगीच्या जळजळटाकडे वळू या. तिथली विषमता– ठेचाळणे– फडफडणे– जळणे– चिरडणे– भरडणे– अनुभवू या – पाहू या– नव्हे जवळ जाऊन. निरखून पाहू या. नाहीतर अशा वेळी खरा कवी सूर बाहेर येणार नाही. कवितांचे निखारे ते देखील जळजळीत याच रणक्षेत्रावर सापडतील.

आपण वास्तवतेकडे वळून प्रक्षोभक कवितेकडे वळू या. अशाच तऱ्हेच्या कवितेचा सूर मी माझ्या काव्यात माझ्या परीने जपलाही आहे. आणि यापुढे जपणार आहे.

# शुद्धी–पत्र

| कविता | पृष्ठक्रमांक | ओळक्रमांक | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| * त्राता | १८ | २१ | पहात | पाहात |
| * त्राता | १८ | २४ | पहात | पाहात |
| * चांगी सुईण | २३ | २५ | वहायची | वाहायची |
| * भटकंतीला निघालो तेव्हा | २५ | १ | निघाळो | निघालो |
| ” | ” | ६ | नसळेला | नसलेला |
| ” | ” | ११ | पुकारळो | पुकारलो |
| ” | ” | १४ | सुटलेय | सुटलय |
| ” | ” | २१ | पहा | पाहा |
| * जातगंगा | ३१ | २१ | रुपयाचा | रुपायाचा |
| * काळा गॉगल | ४० | ९ | म्हणतायेत | म्हणताहेत |
| * मीच मला | ४१ | ४ | देखिल | देखील |
| * दलित | ४४ | २३ | दाखवलेल्या | दाखविलेल्या |
| * व्यथा | ४५ | २ | मिळाली | मिळाला |
| * माझी आजी | ५० | ६७ | पहात | पाहात |
| * रक्ताने माखलेली माती | ५१ | १८ | रहावत | राहावत |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2334 काव्य
22964

REFBK-0022165

REFBK-0022165